# प्रेसनोट

जा.क्र.३२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०५/२०१७

## महिला पोलीस ''मदर्स डे'' व वुमन डे महिला मेळावा

भंडारा:– दिनांक ०९ मे २०१७ रोजी पोलीस मुख्यालय येथील मिटींग हॉलमध्ये पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती. विनीता साहु यांच्या अध्यक्षतेखाली '' मदर्स डे दिन/वुमन डे'' महिला मेळावा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती मृणाल जामदार आयुर्वेद व्यासपीठ नागपुर/श्री. आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक अन्ड वेलनेस सेंटर नागपुर, डॉ. सुधाजी तिवारी वैज्ञानीक एम गिरी वर्धा, राष्ट्रीय शक्ती अध्यक्ष, प्रो. डॉ. अंकीता बोहरे, राष्ट्रीय शक्ती सचिव, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती रश्मि नांदेडकर भंडारा यांचे या उपस्थितीत दिप प्रज्वलन करुन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यात आले.

श्रीमती मृणाल जामदार आयुर्वेद व्यासपीठ नागपुर/श्री. आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक अन्ड वेलनेस सेंटर नागपुर यांनी आपले भाषनात आयुर्वेद विषयाबाबत माहिती दिली. तसेच श्रीमंती प्रो.डॉ. अंकीता बोहरे राष्ट्रीय शक्ती सचिव हयांनी आपल्याला लघुउद्योग या विषयावर माहीती दिली श्रीमंती डॉ सुधाजी तिवारी,वैज्ञानिक एम गिरी वर्धा, राष्ट्रीय शक्ती अध्यक्ष यांनी सर्वसामान्य महिलांवर होणाऱ्या ताणतणाव मुळे शरीरावर होणाऱ्या आजाराविषयी माहीती दिली.

यावेळी मा. पोलीस अधीक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू यांनी कार्यक्रमातील उपस्थित महिलांना मार्गदर्शन करतांना पोलीस दलातील महिला पोलीसांनी दैनंदिनी बाबी विषयी शिस्त पाळायला पाहिजे. कर्तव्य करीत असतांना महिलांना पारीवारीक अडचणी येत असतात. जर त्यांना काही अडचणी असतील तर त्यांनी नि:सकोचपणे आपल्या अडीअडचणी आम्हाला सांगितल्या पाहिजे. आम्ही नक्कीच त्यांच्या समस्येचे निराकरण करु. मा. पोलीस अधीक्षक यांनी सांगितले की कुंटुबातील महिला सदस्य जर आजारी पडली तर त्याचा परीणाम संपुर्ण कुंटुबावर होतो. महिलांनी आपल्या स्वास्थ्याकडे विशेष लक्ष दिले पाहीजें. तणावाच्या परिस्थिती पासुन दुर राहायला पाहिजे. यावेळी मा. पोलीस अधीक्षक यांनी कार्यक्रमातील उपस्थित सर्व महीलांना उत्तम स्वास्थ व उजव्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या.

तसेच अप्पर पोलीस अधीक्षक रश्मि नांदेडकर यांनी आपल्या भाषणात महिलांच्या दैनंदिनी कौटुबींक बाबीवर मार्गदर्शन करुन ज्या महिलांनी पोलीस तपासामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली त्यांना शुभेच्छा दिल्या.

भंडारा पोलीस दलामध्ये ज्या महिला अधीकारी/ कर्मचारी यांनी पोलीस तपासामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली त्या महिला पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना मा. पोलीस अधीक्षक श्रीमती. विनीता साहू यांचे हस्ते प्रशस्तीपत्र देवून त्याचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान विवीध पथनाटय तसेच आर्केस्टाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला पोउपनी. लाजेवार ( माहिती कक्ष / महिला सेल ), पोस्टे/ शाखेतील तसेच पोलीस मुख्यालय येथील महिला पोलीस अधिकारी/ कर्मचारी व त्यांचे कुटूबातील महिला सदस्या मोठया संख्येत उपस्थित होते. सदरचे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्याकरीता महिला सेल प्रभारी मपोउपनी. लाजेवार व त्यांचे अधिनीस्त महिला कर्मचाऱ्यांचा सक्रीय सहभाग होता.

कार्यकमाचे संचालन श्रीमती. स्मिता गालफाडे व आभार प्रदर्शन पोलीस उपअधीक्षक (गृह)श्री. सुनील कुलकर्णी यांनी केले.

10-5.
(के.एम.हत्तीमारे)
सपोनी. जिवीशा भंडारा
दुरध्वनी.क्र८६६८६९५६३५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.